# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुख्यालय :- उद्योग सारथी, महाकाली गुंफा रोड, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई-93.
दूरध्वनी क्रमांक. ०२२-४७४८८३१२ / ४६९९ / ४६७९.


जा.क्र.मऔविम/भूसंपादन/P697591 /२०२६. दिनांक :- 04/6/26

प्रति,
मा. महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान),
मऔविम, मुख्यालय, मुंबई-९३.

विषय :- मौजे पाट, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथे औद्योगिक कारणासाठी उद्योजकाकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) अंतर्गत प्रस्ताव मागविणेबाबत.

संदर्भ :- मा. मु.का.अ., मऔविम यांची दि. ०४/०५/२०२६ रोजीची मंजूर टिप्पणी

उपरोक्त विषयास अनुसरून मौजे पाट, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथे खाजगी ४०.२७७० हे.आर क्षेत्र औद्योगिकीकरणाकरिता उपलब्ध असून प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना म औ वि महामंडळाच्या PASS THROUGH भूसंपादन प्रक्रियेद्वारे भूसंपादन करून उद्योगांकरिता जागेची आवश्यकता असणा-या इच्छूक उद्योजकांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) अंतर्गत प्रस्ताव मागविणेत येत आहेत.

त्यानुषंगाने स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) ची जाहिरात व सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे इ. तपशिल महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या www.midcindia.org या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत यावी ही विनंती. (सोबत जाहिरात, आवश्यक कागदपत्रांचा तपशील असलेले प्रपत्र जोडले आहे.)

सदर पत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करणेत येत आहे.

**सोबत:** संदर्भिय पत्राची प्रत.

03/06/26

(अर्चना मुळे)
महाव्यवस्थापक (भूसंपादन)
मऔविम, मुंबई-९३.

# जाहिरातीचा मसूदा


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

मुख्यालय :- उद्योग सारथी, महाकाली गुंफा रोड, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई-93.

दूरध्वनी क्रमांक. ०२२-४७४८८३१२ / ४६९९ / ४६७९.


**उद्योजकांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) अंतर्गत प्रस्ताव मागविणेबाबत**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील भूसंपादन विषयक तरतुदीं/प्रक्रियेव्दारे मौजे पाट, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथे ४०.२७७० हे. आर क्षेत्र Pass Through पद्धतीने औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेकरिता जमीन घेणेसाठी इच्छुक उद्योजकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त विषयाबाबत उद्योजकांनी सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल महामंडळाच्या संकेतस्थळावर www.midcindia.org वर उपलब्ध करून देणेत आला आहे. इच्छूक उद्योजक /कंपनी यांनी त्यांचे अर्ज/प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी, रत्नागिरी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे कार्यालयात जाहिरात निर्गमित झाले पासून ३० दिवसांत सादर करावेत. सदर बाबत अधिक माहितीकरिता प्रादेशिक अधिकारी, रत्नागिरी (ई-मेल roratnagiri@midcindia.org) या कार्यालयाशी संपर्क करावा.

सही/-

महाव्यवस्थापक (भूसंपादन),

मऔविम, मुंबई-९३.

## उद्योजकांनी प्रस्तावासोबत सादर करावयाचे प्रपत्र १

| अ.क्र. | विषय | |
|---|---|---|
| १. | विनंती अर्ज | |
| २. | सविस्तर प्रकल्प अहवाल | |
| ३. | प्रस्तावित एकुण गुंतवणूक | |
| ४. | उद्योजकांचे मागील ३ वर्षाचे आर्थिक ताळेबंद | |
| ५. | भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा २०१३ नुसार नुकसान भरपाई रक्कमेचा मोबदला देय असून तो देणेबाबतचे तसेच महामंडळाचे पुनर्वसन व पुनर्बहाली धोरण २०१९ लागू असलेबाबत उद्योजकांचे सत्यप्रतिज्ञापत्र | |
| ६. | महामंडळ व महसूल विभागाचा भूसंपादनाबाबत होणारा खर्च अदा करणेबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र | |
| ७. | अनामत रक्कम | |
| ८. | मऔवि महामंडळाचे परिपत्रक दि.१८.०१.१९९४ नुसार Pass Through पद्धतीने जमीन संपादन करणेबाबतचे धोरण बंधनकारक असलेबाबत हमीपत्र | |
| ९. | प्रकल्पाकरिता आवश्यक क्षेत्र | |
| १०. | प्रकल्पाची रोजगार निर्मिती क्षमता | |

# Advertisement Draft

**Maharashtra Industrial Development Corporation**
(Government of Maharashtra Undertaking)
Head Office Udyog Sarathi, Mahakali Caves Road, Marol Industrial Area, Andheri (East), Mumbai 400093..
Telephone No.022-47488312 /4679

Regarding the Invitation of Proposals from Entrepreneurs under the 'Expression of Interest' Initiative**

The Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) hereby invites proposals from entrepreneurs interested in acquiring land for the establishment of an Industrial Area at Mauje Pat, Taluka Mandangad, District Ratnagiri. This land acquisition will be undertaken in accordance with the provisions and procedures regarding land acquisition stipulated under the Maharashtra Industrial Development Act, 1961.

Details regarding the necessary documents to be submitted by entrepreneurs concerning the above subject have been made available on the Corporation's official website: www.midcindia.org. Interested entrepreneurs or companies are required to submit their applications/proposals to the office of the Regional Officer, MIDC, Ratnagiri, within 30 days from the date of issuance of this advertisement. For any further information, Deposit amount, format, Guarantee and Undertaking Draft regarding this matter, please contact the office of the Regional Officer, Ratnagiri (Email: roratnagiri@midcindia.org).

**Sd/-**
**General Manager (Land Acquisition ),**
**MIDC, Mumbai 93.**

# हमीपत्र

मे. प्रादेशिक अधिकारी म.औ.वि.म. रत्नागिरी,

श्री.---------------------------------------- }

प्रोप्रा. मे. ------------------------------------ } लिहून देणार

आम्ही सत्यप्रतिज्ञेवर हमीपत्र लिहून देतो की,

रिळ व उंडी औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे रिळ व उंडी ता. व जि. रत्नागिरी येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेकरिता जमीन घेणेस मी/आम्ही इच्छूक आहे/आहोत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे परिपत्रक दिनांक १८.०१.१९९४ नुसार Pass Through पद्धतीने जमीन संपादन करणेबाबतचे धोरण आम्हास बंधनकारक असून ते मला आम्हास मान्य आहे.

सदरचे हमीपत्र लिहून देणार यांचेवर व त्यांचे वंशवारसांवर लागू व बंधनकारक आहे व राहील. सदरची माहिती खरी व बरोबर आहे, म्हणून लिहून दिले आम्ही आमचे स्वखुशीने, आत्मसंतोषाने व विना दडपण खालील साक्षीदारांसमक्ष हमीपत्र ऐसाजे. वरील हमीपत्रा मधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यात काही खोटे आढळल्यास आम्ही भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२९. २३६ व २३७मधील तरतुदीनुसार होणा-या दंडास व शिक्षेस पात्र राहू.

म्हणून लिहून दिले सदरचे ॲफिडेव्हिट आजरोजी रत्नागिरी मुक्कामी.

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक:

श्री.
प्रोप्रा. मे..

# प्रतिज्ञापत्र

मे. प्रादेशिक अधिकारी म.औ.वि.म. रत्नागिरी, यांना लिहून देणार खालीलप्रमाणे :

मी श्री/श्रीमती-

तर्फे मालक/भागीदार/संचालक

मे. धंदा राहणार वय -वर्षे - सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, नियोजित रिळ व उंडी औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे रिळ व उंडी ता. व जि. रत्नागिरी येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेकरिता जमीन घेणेस मी/आम्ही इच्छुक आहे/आहोत.

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा, २०१३ नुसार संबंधित जमीन मालक/खातेदार/शेतकरी यांना नुकसान भरपाई रक्कमेचा मोबदला देय होणार असून तो देणेबाबत तसेच नियोजित औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत म. औ. वि. महामंडळ व महसूल विभागाचा होणारा खर्च अदा करणेबाबत माझी/आमची कोणतीही हरकत नाही. तसेच सदरहू औद्योगिक क्षेत्रास महामंडळाचे पुनर्वसन व पुनर्बहाली धोरण, २०१९ लागू असून ते मला / आम्हास मान्य व कबूल आहे. महामंडळाचे सध्या अस्तित्वातील असलेल्या व भविष्यातील अटी, शर्ती व नियम मला/आम्हास बंधनकारक राहतील.

सदरचे हमीपत्र लिहून देणार यांचेवर व त्यांचे वंशवारसांवर लागू व बंधनकारक आहे व राहील. सदरची माहिती खरी व बरोबर आहे, म्हणून लिहून दिले आम्ही आमचे स्वखुशीने, आत्मसंतोषाने व विना दडपण, खालील साक्षीदारांसमक्ष हमीपत्र देत आहोत. वरील प्रतिज्ञापत्रामधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यात काही खोटे आढळल्यास आम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२९, २३६ व २३७मधील तरतुदीनुसार होणा-या दंडास व शिक्षेस पात्र राहू.

म्हणून लिहून दिले सदरचे हमीपत्र/प्रतिज्ञापत्र आज रोजी रत्नागिरी मुक्कामी.

ठिकाण : रत्नागिरी

दिनांक :

श्री/श्रीमती

मालक/भागीदार/संचालक मे..

साक्षीदार-

१. श्री/श्रीमती.

२. श्री/श्रीमती.

# प्रतिज्ञापत्र

मे. प्रादेशिक अधिकारी म.औ.वि.म. रत्नागिरी, यांना लिहून देणार खालीलप्रमाणे :

तर्फे मालक/भागीदार/संचालक

मी श्री/श्रीमती-मे. धंदा - राहणार- वय वर्ष - सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, नियोजित रिळ व उंडी औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे रिळ व उंडी ता. व जि. रत्नागिरी येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेकरिता जमीन घेणेस मी/आम्ही इच्छूक आहे/आहोत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे परिपत्रक दिनांक १८.०१.१९९४ नुसार Pass Through पद्धतीने जमीन संपादन करणेबाबतचे धोरण आम्हास बंधनकारक असून ते मला / आम्हास मान्य आहे. तसेच महामंडळाचे सध्या अस्तित्वातील असलेल्या व भविष्यातील अटी, शर्ती व नियम मला/आम्हास बंधनकारक राहतील.

सदरचे हमीपत्र लिहून देणार यांचेवर व त्यांचे वंशवारसांवर लागू व बंधनकारक आहे व राहील. सदरची माहिती खरी व बरोबर आहे, म्हणून लिहून दिले आम्ही आमचे स्वखुशीने, आत्मसंतोषाने व विना दडपण, खालील साक्षीदारांसमक्ष हमीपत्र देत आहोत. वरील प्रतिज्ञापत्रामधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यात काही खोटे आढळल्यास आम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२९, २३६ व २३७ मधील तरतुदीनुसार होणा-या दंडास व शिक्षेस पात्र राहू.

म्हणून लिहून दिले सदरचे हमीपत्र/प्रतिज्ञापत्र आजरोजी रत्नागिरी मुक्कामी.

ठिकाण : रत्नागिरी

दिनांक :

श्री/श्रीमती

मालक/भागीदार/संचालक मे..

साक्षीदार-

१. श्री/श्रीमती.

२. श्री/श्रीमती.